# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागीय भंगार १२३ बसेसचे MSTC पोर्टलवर विक्री करण्याकरीता दि. ३०/०५/२०२५ रोजी निविदा अंतर्गत बोली दर मागविण्यात आलेली असता त्यामध्ये संमिश्र प्रतिसाद प्राप्त झाला. विभागातर्फे प्रस्तावित तीन बिड पैकी अनुक्रमे बीड लॉट क्र. ०१ व ०२ ला बोली दर हातचे मुल्य (Upset value) राशी पेक्षा जास्त प्राप्त झाली नाही, त्यामुळे ऑनलाईन पध्दतीने दोन्हीही हे खारीज (Reject) करण्यात आले. लॉट क्र. ०१ व ०२ ला उच्यतम दर मिळण्याकरीता दि. २९/०७/२०२५ रोजी पुन:श्च MSTC पोर्टलवर ई-निविदेव्दारे दर मागविण्यात आले.

**{ परिवहन विभाग }**

लॉट क्र. ०१ व ०२ करीता मे. री-वाहन रीसायकलर्स प्रा. लि. नागपूर यांचेतर्फे उच्चतम दर प्राप्त झालेले आहे. लॉट क्र. ०१ (४९ भंगार बसेस) चे हातचे मुल्य (Upset value) राशी रु. ७३,९२,०००/- च्या प्रतिसादार्थ रु. ८१,९५,०००/- राशीचे उच्यतम दर प्राप्त झाले असुन लॉट क्र. ०२ (१५ भंगार बसेस) चे हातचे मुल्य (Upset value) राशी रु. २३,२१,०००/- च्या प्रतिसादार्थ रु. ३०,००,००१/- राशीचे उच्यतम दर प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त प्राप्त दराला मान्यता प्रदान करुन संबंधित निविदाकारास भंगार बसेस - ६४ नग (४९+१५) हस्तांतरीत करण्याचा विषय विचारात घेणे.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 335/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 20/10/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रशासकीय अधिकारी, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागीय भंगार १२३ बसेसचे MSTC पोर्टलवर विक्री करण्याकरीता दि. ३०/०५/२०२५ रोजी निविदा अंतर्गत बोली दर मागविण्यात आलेली असता त्यामध्ये संमिश्र प्रतिसाद प्राप्त झाला. विभागातर्फे प्रस्तावित तीन बिड पैकी अनुक्रमे बीड लॉट क्र. ०१ व ०२ ला बोली दर हातचे मुल्य (Upset value) राशी पेक्षा जास्त प्राप्त झाली नाही, त्यामुळे ऑनलाईन पध्दतीने दोन्हीही हे खारीज (Reject) करण्यात आले. लॉट क्र. ०१ व ०२ ला उच्यतम दर मिळण्याकरीता दि. २९/०७/२०२५ रोजी पुन:श्च MSTC पोर्टलवर ई-निविदेव्दारे दर मागविण्यात आले.

लॉट क्र. ०१ व ०२ करीता मे. री-वाहन रीसायकलर्स प्रा. लि. नागपूर यांचेतर्फे उच्चतम दर प्राप्त झालेले आहे. लॉट क्र. ०१ (४९ भंगार बसेस) चे हातचे मुल्य (Upset value) राशी रु. ७३,९२,०००/- च्या प्रतिसादार्थ रु. ८१,९५,०००/- राशीचे उच्यतम दर प्राप्त झाले असुन लॉट क्र. ०२ (१५ भंगार बसेस) चे हातचे मुल्य (Upset value) राशी रु. २३,२१,०००/- च्या प्रतिसादार्थ रु. ३०,००,००१/- राशीचे उच्यतम दर प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त प्राप्त दराला मान्यता प्रदान करुन संबंधित निविदाकारास भंगार बसेस - ६४ नग (४९+१५) हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.